प्रेसनोट

दि. २९/०७/२०१९

## कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन, पुणे शहर

### जेष्ठ नागरिकांचे चोरीस गेलेले लाखो रुपयाचे दागिने केले २४ तासात हस्तगत

कोरेगाव पार्क पो.स्टे.गु.र.नं.२२१/२०१९ भा.दं.वि.कलम ३८१ फिर्यादी महिला मरियम अब्दुल वालजी वय ६७ वर्षे रा-फ्लॅट नं.७०२,ली मिराज सोसायटी, को-ऑप हौसिंग सोसा.कोरेगावपार्क पुणे या त्यांच्या पतीसह दोघेच नमुद पत्त्यावर राहतात.त्यांचे घरी या दोन जेष्ठ नागरिकां व्यतिरीक्त रहावयास कोणीही नाही.याच गोष्टीचा फायदा मोलकरणीने घेवुन त्यांची मोलकरीण नामे राजश्री विनोद सावंत रा १३ ताडीवाला रोड,पुणे हिने फिर्यादी व त्यांचे पती यांचे परस्पर घरातील २ लाख २७ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने लंपास केले होते.नमुद घटनेबाबतचा गुन्हा दाखल होताच मंगलदास पोलीस चौकीच्या महिला पोलीस उपनिरीक्षक मनिषा टुले यांनी अत्यंत कौशल्याने सदर गुन्हयाचा तपास करुन २४ तासाच्या आत चोरीस गेलेले सर्व दागिने हस्तगत केले .

नमुद गुन्हयाचा तपास मा.श्री.मदन बहाद्दरपुर वरिष्ठ पोलीस निरीक्षक कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन व मा.श्री गणेश माने पोलीस निरीक्षक गुन्हे यांच्या मार्गदर्शनाखाली व महिला पोलीस उप-निरीक्षक चित्रा चौधरी , पोलीस उप-निरीक्षक श्रीकांत गुरव, पो.हवा गोकावी. पो.हवा अर्जुन कांबळे. पो.शि. श्रीनाथ कांबळे यांच्या मदतीने करण्यात आला .सदर गुन्हयाचा पुढील तपास हा मनिषा टुले महिला पोलीस उपनिरीक्षक या करीत आहे.



...लीस निरीक्षक

...पार्क पो.स्टे.पुणे